दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २२२ । शुक्रवार २९ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# नगरची जागा भाजपच्या वाट्याला, पुण्याची जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडे

### राज्यात महायुतीच्या जागावाटप ठरले । नगरला भाजप विरुद्ध काँग्रेस सामना रंगण्याची शक्यता

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पुढील महिन्यात होणाऱ्या विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असून, आज महायुतीचे जागावाटप ठरविण्यात आले. त्यात अहिल्यानगरची राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याची जागा भाजपला देण्यात आली असून, पुण्यातील भाजपची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला सोडण्यात आली आहे. त्यामुळे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांची नगरच्या जागेवरील दावेदारी अधिकच बळकट झाली आहे. आज-उद्या त्यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. नगरमध्ये भाजप विरुद्ध काँग्रेस असा सामना रंगण्याची शक्यता आहे.

राज्यात भाजपला १०, शिवसेनेला ४ तर राष्ट्रवादीला २ जागा देण्यात येणार आहेत. छत्रपती संभाजीनगरच्या जागेवर अद्याप निर्णय झालेला नाही.

**जिल्ह्यातील पक्षीय बलाबल**

| | |
|---|---|
| भाजप | १९९ |
| राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) | ५० |
| शिवसेना (शिंदे) | ४८ |
| राष्ट्रवादी काँग्रेस (शप) | ३५ |
| काँग्रेस | २९ |
| इतर | १०० |
| एकूण | ४६१ |

महायुतीच्या जागावाटपात अहिल्यानगरची जागा भाजपला सोडून पुण्याची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला देण्यात आली आहे. मात्र या बदल्यात मंत्रिमंडळातील एका महत्वाच्या खात्याची तडजोड झाली असून राष्ट्रवादीने अर्थखात्यावरील दावा सोडण्यास संमती दिल्याचे सांगण्यात येते.

शिवसेनेच्या वाट्याला ठाणे, यवतमाळ, नाशिक, परभणी आणि हिंगोली

राष्ट्रवादीला पुणे आणि कोकण. तर उरलेल्या ठिकाणी भाजप -नागपूर, अहिल्यानागर, धाराशिव, जळगाव, सोलापूर, लातूर, नांदेड, अमरावती, वर्धा-गडचिरोली-चंद्रूपर, भंडारा-गोंदिया, सातारा-सांगली असे महायुतीचे जागावाटप ठरले आहे.


दरम्यान, दिनांक १ जून ही अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत असल्याने येत्या एक-दोन दिवसांत उमेदवार जाहीर होतील. त्यात नगरमध्ये भाजपच्या वाटेवर असलेले माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांचा भाजप प्रवेश व उमेदवारीची घोषणा दोन्हीही आज-उद्या होण्याची शक्यता राजकीय वर्तुळातून वर्तविली जात आहे.

### एसपी साहेब, शहर विभागातील बदल्यांचा पॅटर्न बदला...

# कोतवालीतून तोफखाना आणि तोफखान्यातून कोतवाली नको!

### सोयीच्या बदल्यांचा कायद्याच्या अंमलबजावणीत येतोय अडसर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सध्या जिल्हा पोलीस दलात बदल्यांचे वारे वाहत असून, येत्या दोन-तीन दिवसांत याबाबतची प्रक्रिया पूर्ण होईल. परंतु पोलिसांच्या बदल्यांमध्ये कळीचा मुद्दा ठरलेल्या शहर विभागातील तोफखाना व कोतवाली या दोन पोलीस ठाण्यांतील बदल्यांचा अदली-बदली पॅटर्न यंदा तरी बदलणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. कोतवाली व तोफखाना या शहरातील जवळच्या पोलीस ठाण्यांत होणाऱ्या सोयीच्या बदल्यांमुळे कायद्याच्या अंमलबजावणीत मोठा अडसर ठरत असल्याचे चित्र दिसून येत असल्याने या दोन पोलीस ठाण्यांत कर्मचाऱ्यांची अदलाबदली करण्यापेक्षा त्यांना शहर सोडून दुसऱ्या ठिकाणी नियुक्त्या देणे कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सोयीस्कर राहील, असा सूर पोलीस वर्तुळातूनच उमटत आहे.

सध्या पोलीस दलात जिल्हांतर्गत बदल्यांचे वारे वाहत आहेत. पोलीस शिपाई ते सहायक फौजदार या वर्गातील कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्या होणार आहेत. नगर शहर विभागात कोतवाली, तोफखाना व भिंगार कॅम्प अशी तीन पोलीस ठाणी आहेत. मात्र, त्यापैकी कोतवाली व तोफखाना हे पोलीस ठाणे जवळजवळ असल्याने या दोन्ही पोलीस ठाण्यांमध्ये नियुक्तीसाठी पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये चढाओढ असते.

दरवर्षी कोतवालीतून तोफखान्यात व तोफखान्यातून कोतवालीत अदलाबदली होऊन सोयीचे ठिकाण मिळविण्यासाठी अनेकजण फिल्डींग लावतात. दरवर्षी दहा ते पंधरा कर्मचारी तोफखान्यातून कोतवालीत व कोतवालीतून तोफखान्यात रुजू होतात. परंतु शहरातील कोतवाली व तोफखाना या दोन्ही ठिकाणी अशा होणाऱ्या सोयीच्या बदल्यांमुळे कर्मचाऱ्यांची बदलीची मानसिकता राहत नाही. असे कर्मचारी शहर विभागाशी सुपरिचित असल्यामुळे गुन्हे शोध पथक किंवा इतर महत्त्वाच्या ठिकाणी नियुक्तीसाठी त्यांची कायम धडपड सुरू राहते. यातून कायद्याच्या अंमलबजावणीत मोठा अडसर निर्माण होत असल्याची अनेक उदाहरणे आहेत.

त्यामुळे यावर्षी तरी एसपींनी बदल्यांचा हा पॅटर्न बदलून तोफखाना व कोतवालीतील ही अदलाबदली बंद करून अशा कर्मचाऱ्यांना बाहेर ठिकाणी नियुक्ती देण्याची मागणी पोलीस वर्तुळातून होत आहे.

**अदलाबदली करण्याऐवजी शहराबाहेर नियुक्ती द्यावी**

**नवे एसपी मुम्मका सुदर्शन यांनी सर्वसामान्य नगरकरांना कायदा-सुव्यवस्था राखण्याबरोबरच पोलीस व नागरिकांमध्ये सुसंवाद राहील, याची ग्वाही दिली आहे. त्यांची प्रभावी अंमलबजावणी करायची असेल तर नगर शहरातील कोतवाली व तोफखाना येथील कर्मचाऱ्यांची अदलाबदली न करता त्यांना दुसऱ्या ठिकाणी शहराबाहेर नियुक्ती देण्याची गरज व्यक्त होत आहे.**

# पाईपलाईन रोड गोळीबार, फिर्यादीच निघाला आरोपी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पाईपलाईन रोड येथील भिस्तबाग चौकाजवळ गोळीबार झाल्याची घटना रविवारी (दि. २४) सकाळी घडली होती. या घटनेतील फिर्यादीच मुख्य आरोपी निघाला असून, तोफखाना पोलिसांनी या गुन्ह्याचा छडा लावला आहे.

रविवारी सकाळी नऊच्या सुमारास एका चहाच्या टपरीवर बंदुकीतून आपल्या दिशेने गोळीबार झाल्याची फिर्याद चिरंजीव गाढवे (रा. नागापूर, एमआयडीसी) याने तोफखाना पोलिसांत दिली होती. गोळीबारात जखमी झाल्याचे सांगून तो सिव्हील रुणालयात उपचारासाठी दाखल झाला होता. तसेच काही संशयितांची नावे पोलिसांना सांगितली होती. त्यात शिवसेनेचे माजी शहरप्रमुख दिलीप सातपुते, संभाजी कदम यांच्या शिष्टमंडळाने एसपींना निवेदन देऊन फिर्यादी हा जाणीवपूर्वक काहीजणांना खोट्या गुन्ह्यात गोवत असल्याचे म्हटले होते.

त्यावर एसपींनी पूर्ण खातरजमा करून कारवाई करण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले होते.

घटनास्थळी अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, डीवायएसपी दिलीप टिपरसे, तोफखान्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांनी भेट देऊन माहिती घेतली होती. तोफखाना पोलिसांनी केलेल्या तपासात या गुन्ह्यातील फिर्यादी चिरंजीव गाढवे हाच मुख्य आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. चौकशीसाठी ताब्यात घेतलेल्या एका संशयिताने हा गुन्हा फिर्यादी गाढवे यानेच केल्याची कबुली दिली. सध्या चिरंजीव गाढवे हा फरार असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

# जेऊरला कत्तलखान्यावर छापा, दोनशे किलो गोमांस जप्त




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील जेऊर बायजाबाई येथे अवैध कत्तलखान्यावर एमआयडीसी पोलिसांनी छापा टाकून सुमारे साठ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

दिनांक २८ रोजी सपोनि माणिक चौधरी यांना जेऊर बायजाबाई येथे अवैधरित्या गोवंशीय जनावरांची कत्तल केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने जाऊन खात्री केली असता, आरोपी नामे अजिम शरीफ पठाण व अयसान अजिम पठाण (दोघे रा. जेऊर बायजाबाई ता.जि.नगर) व एक अनोळखी इसम यांच्या राहत्या घरामध्ये कत्तल करून ठेवलेले ६० हजार रुपये किंमतीचे अंदाजे २०० किलो गोमांस व कत्तलीचे साहित्य मिळून आले. आरोपींविरुध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३२५, २७१, २७२, सह महाराष्ट्र प्राणि संरक्षण अधिनियम चे कम ५ (क), ९ (अ) (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे. उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि माणिक चौधरी, पोसई मनोज मोंढे, पोहेकॉ सुशांत दिवटे, पोशि ज्ञानेश्वर तांदळे, पोशि शुभम सुटुक, पोशि गोरक्षनाथ जावळे, पोशि जयसिंग शिंदे, पोशि सचिन हरदास यांच्या पथकाने केली.

# गावठी हातभट्टीवर तीन ठिकाणी कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील निमगाव घाणा व टाकळी खातगाव येथे गावठी हातभट्टीवर एमआयडीसी पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. याप्रकरणी तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून ८६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जागीच नष्ट करण्यात आला आहे. पान ४ वर

# निविदेशिवाय नाली काम सुरू असल्याचा आरोप; नागरिकांमध्ये संताप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण शहरातील गट क्रमांक १८८ व १८९ परिसरात प्रस्तावित नाली बांधकाम व त्या परिसरातील दुकाने आणि घरे हटविण्याच्या हालचालींमुळे नागरिक व दुकानदारांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या तीन दिवसांपासून नगर परिषदेकडून भोंग्याद्वारे दुकानदारांना आपले साहित्य हटविण्याच्या सूचना दिल्या जात आहेत.




स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, शशी विहार परिसरातील नालीचे सांडपाणी थेट गोदावरी नदीत सोडण्यासाठी ही नाली बांधण्यात येणार असून त्यासाठी गट क्रमांक १८८ व १८९ मधील नागरिकांच्या स्वतःच्या मालकीच्या जागेवरील दुकाने व घरे हटविण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे अनेक गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. सदरील काम कोणत्या ठेकेदारामार्फत सुरू आहे, याबाबत स्थानिकांना कोणतीही माहिती नसल्याचा आरोप होत आहे. तसेच या कामासाठी नगर परिषदेकडून कोणतीही अधिकृत निविदा काढण्यात आलेली नसून संबंधित कामाची माहिती सार्वजनिक करण्यात आलेली नाही, असा दावा व्यापाऱ्यांनी केला आहे. पान ४ वर

# महामार्गावरील दिशादर्शक फलकांवरील जुनी नावे तात्काळ बदलण्याची मागणी; अन्यथा आंदोलनाचा इशारा

### राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राज्य शासनाने अधिकृतपणे औरंगाबाद शहराचे नाव बदलून छत्रपती संभाजीनगर तसेच अहमदनगर जिल्ह्याचे नाव बदलून अहिल्यानगर असे घोषित केले असतानाही महामार्गावरील व सार्वजनिक ठिकाणांवरील दिशादर्शक फलकांवर अद्याप जुनी नावेच कायम असल्याने राष्ट्रवादी युवक काँग्रेसने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शासन निर्णयाची अंमलबजावणी न केल्याचा आरोप करत, आठ दिवसांच्या आत सर्व फलकांवरील नावे अद्ययावत करून ''छत्रपती संभाजीनगर'' व ''अहिल्यानगर'' अशी नोंद करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने देमहामार्गावरील दिशादर्शक फलकांवरील जुनी नावे तात्काळ बदलण्याची मागणी; अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता यू. ए. बोरुडे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनाद्वारे शासन आदेशाचे उल्लंघन होत पान ४ वर

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या १२ वर्षांची पूर्तता: भारत जागतिक शक्ती म्हणून उदयास

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मोदींजींच्या कार्यकाळाला 'राष्ट्रनिर्माणाचा सुवर्णकाळ'म्हणून केले अधोरेखित । पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारताचा बदलला चेहरा; १२ वर्षांच्या त्यांच्या कार्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** देशाचा स्वाभिमान जागा करून परिवर्तन घडवलं जाऊ शकते, हे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी त्यांच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात केलेल्या कार्याने दाखवून दिले आहे. फक्त अनुदान घेणे ही वृत्ती न बाळगता देशाला जगामध्ये स्वाभिमानाने उभा असलेला भारत देश बनवण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. एवढेच नाही तर देशात मेक इन इंडिया ही चळवळ राबवून मेक फॉर वर्ल्ड च्या दिशेने देशाची वाटचाल सुरू करण्यामागे मोलाचे योगदान दिले आहे. ज्या भारताकडे पूर्वी एक याचक राष्ट्र म्हणून पाहिले जायचे, त्याला जागतिक महाशक्ती बनविण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी केले आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत काढले. देशाचे लाडके पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी २६ मे २०२६ रोजी पंतप्रधान पदाच्या कारकिर्दीची १२ वर्षे पूर्ण करत आहेत. मोदीजींच्या यशस्वी, दूरदर्शी आणि परिवर्तनकारी राष्ट्रसेवेचे एक तप हे भारतासाठी आणि समस्त भारतीयांसाठी वरदान ठरले आहे. या ऐतिहासिक पर्वानिमित्त राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती या विशेष संग्राह्य अंकाचे प्रकाशन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते आज मुंबईतील प्रभादेवी स्थित रविंद्र नाट्यमंदिर येथे करण्यात आले, या प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी त्यांच्या सोबत भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मुंबई अध्यक्ष अमित साटम, मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार निरंजन डावखरे, आमदार संजय कुटे, आमदार सुनील राणे उपस्थित होते.






देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, मोदींजींनी मागील १२ वर्षांत केलेले कार्य खूप मोठे आहे. एका पुस्तकात ते कार्य मांडणे खूप कठीण काम आहे. देशातील तळागाळातील शेवटच्या माणसाला सरकारच्या योजनांचा लाभ मिळावा यासाठी मोदींजींनी सतत प्रयत्न केले. हर घर शौचालय, उज्वला गॅस योजना यांसारख्या योजना त्यांनी राबवल्या. सरकारच्या अनुदानावर जनतेला न ठेवता गरीब केंद्रित अजेंडा त्यांनी राबवला. त्याचाच परिणाम म्हणून मागील १० वर्षांत २५ कोटी जनतेला गरिबीतून बाहेर काढण्यात सरकारला यश आले. भारताचा २०१३-१४ मध्ये १०३ लाख कोटी होता तो २०२५-२६ मध्ये ३५७ लाख कोटींपर्यंत म्हणजेच तिप्पट वाढवला. महाराष्ट्राचा २०१३-१४ मध्ये १३ लाख कोटी इतका होता तो २०२५-२६ पर्यंत ५४ लाख कोटी इतका वाढवला. हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. पंतप्रधान मोदींजींचे १२ वर्षांत केलेला देशाचा विकास हा फक्त घोषणांनी झालेला नाही, तर त्यामागे त्यांची विकासाभिमुख नियोजनबद्ध रणनीती हे मुख्य कारण आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या बारा वर्षांत भारताने केवळ विकास केला नाही, तर जगासमोर एका नव्या राष्ट्रशक्तीचा आदर्श उभा केला आहे. आजचा भारत आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करणारा, डिजिटल तंत्रज्ञानाने सक्षम झालेला, उद्योगशील आणि नारीशक्तीला केंद्रस्थानी ठेवणारा समर्थ राष्ट्र म्हणून जगभरात ओळखला जात आहे, असे गौरवोद्गार भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी "राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती"या विशेष संग्राह्य अंकाच्या प्रकाशन सोहळ्यात काढले. "राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती" म्हणजे खरंतर देशाच्या जनतेने अनुभवलेला परिवर्तनाचा इतिहास आहे, असे सांगत रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की, गेल्या एका तपामध्ये सामान्य माणसाच्या आयुष्यात घडलेला बदल प्रत्येक भारतीयाने अनुभवला आहे. शेतकरी, कामगार, गरीब, वंचित आणि उपेक्षितांना सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारी व्यवस्था मोदी सरकारने निर्माण केली.

पारदर्शक शासनपद्धतीमुळे सरकारी योजनांचा लाभ थेट शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला. देशातील गरीबांच्या घरात उजेड, महिलांच्या आयुष्यात सन्मान, युवकांच्या हातात संधी आणि सामान्य नागरिकांच्या मनात आत्मविश्वास निर्माण झाला. "एक भारत, अखंड भारत"ते "विकसित भारत"या प्रवासातील परिवर्तनाची १२ विषयांवरील तथ्यपूर्ण मांडणी या विशेष अंकातून करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

या विशेष संग्राह्य अंकामध्ये अखंड भारत, अंत्योदय, सुरक्षित भारत, युवा भारत, मातृप्रधान भारत अशा विषयांपासून विज्ञान, उद्योग आणि विकसित भारत २०४७ यावर विशेष प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. भारताने जागतिक स्तरावर निर्माण केलेला प्रभाव, सीमांवर शत्रूला दिलेले सडेतोड उत्तर आणि जगातील संकटसमयी मानवतेसाठी धावून जाणारा संवेदनशील भारत यांचेही या अंकात दस्तावेजीकरण करण्यात आले आहे. "राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती" हा केवळ स्मरणिका नसून नव्या भारताच्या परिवर्तनाचा साक्षीदार ठरणारा ऐतिहासिक दस्तावेज असल्याचे रविंद्र चव्हाण यांनी नमूद केले.

"काही व्यक्ती अध्यात्मातून तपस्या करतात, काही कला आणि साहित्याच्या माध्यमातून समाजासाठी जगतात; पण मोदीजींनी स्वतःला राष्ट्रसेवेसाठी समर्पित केले आहे. म्हणूनच ते राष्ट्र तपस्वी आहेत," असे सांगत मोदीजींच्या कार्याची पुस्तकरूपी माहिती जनतेला संकलित स्वरूपात द्यावी, या उद्देशाने "राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती" हा विशेष संग्राह्य अंक प्रकाशित करण्यात आल्याचेही प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी स्पष्ट केले.

## दै. आकर्षण निवडक

### स्वा. सावरकरांच्या स्वप्नातील शस्त्रसिद्ध भारत विषयावर मेजर मोहिनी गर्गे-कुलकर्णी यांचे प्रेरणादायी व्याख्यान




अहिल्यानगर - विचारभारती तर्फे सावेडी येथील माऊली संकुल येथे ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी निवृत्त मेजर, लेखिका व प्रेरक वक्त्या मा. मेजर मोहिनी गर्गे-कुलकर्णी यांनी "स्वा. सावरकरांच्या स्वप्नातील शस्त्रसिद्ध भारत" या विषयावर प्रभावी व प्रेरणादायी व्याख्यान दिले. त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या राष्ट्रभक्ती, सैन्यसज्जता आणि सक्षम भारताच्या विचारांविषयी सखोल माहिती उपस्थितांना दिली. कार्यक्रमानंतर मेजर मोहिनी गर्गे-कुलकर्णी यांनी स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांना 'अपराजिता गाथा भारतीय विरांगनांची' हे पुस्तक भेट दिले. यावेळी डॉ. प्रकाश कांकरिया उपस्थित होते.

### श्रीरामकृष्णमध्ये सुरू होत आहे एआयची नवीन बॅच



अहिल्यानगर- श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना ज्युनिअर कॉलेज, अहिल्यानगर येथे मातोश्री सरजू देवी रामावतार मानधना सेंटर ऑफ एक्सलन्स द्वारे आयोजित करण्यात आलेल्या ' कोर्सच्या दुसऱ्या बॅचला विद्यार्थी, पालक, व्यावसायिक आणि व्यवसायिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.४ मे ते २१ मे २०२६ या कालावधीत पार पडलेल्या या बॅचमध्ये एकूण २२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी २० विद्यार्थ्यांनी भारत सरकार मान्यताप्राप्त प्रमाणपत्र यशस्वीरित्या पूर्ण केले. तसेच एका विद्यार्थ्याने पूर्ण करून संस्थेचा गौरव वाढवला.दररोज २ तास घेण्यात आलेल्या या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांनाचे आणि - यांचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले.हा कोर्स डिजिटल मार्केटिंग एक्सपर्ट प्रा. प्रकाश सोनार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.दुसऱ्या बॅचच्या यशानंतर आणि वाढत्या मागणीमुळे आता चा तिसरी बॅच १ जून २०२६ पासून सुरू होत आहे. हा कोर्स केवळ विद्यार्थ्यांसाठीच नाही, तर पालक, व्यावसायिक आणि व्यवसाय ऑटोमेशन शिकू इच्छिणाऱ्यांसाठीही अत्यंत उपयुक्त ठरत आहे. कोर्स साठी फक्त ३० जागा उपलब्ध आहेत.

### हाजी जाफर मुश्ताक हुसेन यांचे निधन

अहिल्यानगर - लालटाकी येथील हाजी जाफर



मुश्ताक हुसेन (वय ८० वर्षे) यांचे वृध्दापकाळाने नुकतेच निधन झाले. ते तांबटकर गल्ली येथे जुन्या काळातील फॅब्रिकेशनचे प्रसिध्द व्यावसायिक होते. त्यांच्या पश्चात आठ मुली, दोन मुले, सुना, नातवंडे, पंतू असा मोठा परिवार आहे. माजी उपमहापौर हाजी नजीर हुसेन यांचे चुलते, ज्येष्ठ वृत्त छायाचित्रकार राजू शेख यांचे सासरे व नूर शेख वेल्डिंगवाले यांचे ते वडिल होते. धार्मिक व मनमिळावू स्वभावामुळे ते सर्वांना सुपरिचित होते. त्यांच्या निधनाने कुटुंबीयांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

# डिझेल टंचाईने शेती संकटात; मशागतीची कामे ठप्प

**ट्रॅक्टर बंद, पंपांवर रांगा; खरीपपूर्वीच शेतकरी चिंतेत**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** खरीप हंगाम तोंडावर आला असताना पैठण तालुक्यात डिझेलची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची मशागतीची कामे ठप्प झाली असून ट्रॅक्टर जागेवर उभे राहण्याची



वेळ आली आहे. बैलांची संख्या कमी झाल्याने बहुतांश शेतकरी शेतीसाठी ट्रॅक्टरवर अवलंबून आहेत. मात्र डिझेल उपलब्ध होत नसल्याने शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

तालुक्यातील बहुतांश शेती ही पावसावर आधारित आहे. बदलत्या काळात शेतीचे यांत्रिकीकरण वाढल्याने बैलजोडीची जागा ट्रॅक्टरने घेतली आहे. लहान-लहान शेतजमिनी आणि वाढलेला खर्च यामुळे बैल पाळणे परवडेनासे झाले असून बहुतांश शेतकरी ट्रॅक्टरच्या साहाय्याने शेतीची कामे करतात. सध्या पावसापूर्व मशागतीचे दिवस सुरू असताना तालुक्यातील अनेक पेट्रोल पंपांवर डिझेलचा तुटवडा जाणवत आहे. काही ठिकाणी पंप बंद ठेवण्याची वेळ आली असून सुरू असलेल्या पंपांवर डिझेलसाठी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. अनेक शेतकऱ्यांना तासन्तास प्रतीक्षा करूनही डिझेल मिळत नसल्याची तक्रार आहे. डिझेलअभावी शेतातील मशागतीची कामे रखडली असून पेरणीपूर्व तयारीवर परिणाम होत आहे. वेळेत पेरणी न झाल्यास उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत. शासनाने तातडीने डिझेल पुरवठा सुरळीत करून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

# साऊ एकल महिला समितीच्या सहा वर्षाच्या प्रयत्नांना यश- जिल्हाध्यक्ष अशोक कुटे

**एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण करण्यासाठी शासकीय समिती स्थापन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एकल महिलांच्या प्रश्नावर धोरण ठरवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मसुदा समिती नेमली आहे. एकल महिलांना सक्षम करण्यासाठी स्वतंत्र धोरण करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य असणार आहे .महिला बालकल्याण आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या या समितीत सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी असून साऊ एकल महिला समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी यांचाही या समितीत समावेश आहे.



साऊ एकल महिला समितीचे अहिल्यानगर जिल्हा अध्यक्ष अशोक कुटे, राज्य समन्वयक मिलिंद साळवे, तालुका समन्वयक कारभारी गरड, संगीता मालकर, प्रतिभा कुलकर्णी, उज्वला शेळके, प्रकाश जोंधळे, श्रीकांत बिडवे, प्रकाश इथापे,दत्तात्रय उरमुडे, बाळासाहेब जपे, जयश्री अशोक कुटे, सुजाता गोरे, अश्विनी झरेकर, विद्याताई दिवटे अमोल घोलप प्रथमेश सोनवणे यांनी या निर्णयाबद्दल सरकारचे मनापासून अभिनंदन केले आहे.

एकल महिलांची मोठी संख्या बघता स्वतंत्र धोरणाची आवश्यकता होती. २०११ साली महाराष्ट्रात एकल महिलांची संख्या ५४लाख होती ,ती १५ वर्षानंतर किमान ७०लाख असेल. त्यामुळे या महिलांचे आर्थिक सामाजिक सांस्कृतिक ग्रामीण शहरी असे सर्व प्रश्न बघता धोरणाची गरज होती

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या बजेटच्या भाषणात एकल महिलांसाठी लवकरच धोरण जाहीर करण्यात येईल अशी घोषणा केली होती . त्या घोषणेच्या अंमलबजावणीची साऊ एकल महिला समितीने विनंती केल्यावर मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी एकल महिला प्रश्नावर दोन बैठका घेतल्या व मसुदा समिती स्थापन करण्याचे महिला बालकल्याण विभागाला सूचित केले.महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व बालकल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर या दोघींनीही त्यानंतर एकल महिला धोरण विषयावर चर्चा करण्यासाठी बैठका घेऊन समिती स्थापन केली. राज्यात असलेल्या सर्व शासकीय विभाग,अधिकारी,लोकप्रतिनिधी व

व या प्रश्नावर व महिला प्रश्नावर काम करत असलेल्या सर्व संस्था,संघटना यांच्याशी ही समिती चर्चा करेल व विविध विभागांच्या योजनांचे एकत्रीकरण, बदल,नवीन प्रस्ताव करून राज्याचे धोरण होईल.

# विराज पिसाळची राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धा मणिपूरसाठी निवड

**एकलव्य तायक्कांदो अकॅडमी आहिल्यानगरचा विराज पिसाळ ठरला सुवर्णपदकाचा मानकरी**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नुकत्याच जेजुरी येथे ताइक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत एकलव्य तायक्कांदो अकॅडमी चा खेळाडू विराज पिसाळ याने ५४ किलो वजन गटामध्ये सुवर्णपदक मिळवून आपले राष्ट्रीय स्पर्धेसाठी शिककामोर्तब केल . या सुवर्ण पदाकामुळे त्याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. उत्तम कामगिरी करत त्याने तायक्कांदो खेळासाठी अहिल्यानगरच्या शिरापेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या निवडीबद्दल त्याचे तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप ओंबासे सर, महासचिव गफ्फर पठाण सर, खजिनदार प्रसाद कुलकर्णी सर, उपाध्यक्ष घनश्याम सानप सर यांनी अभिनंदन केले. विराज ला प्रशिक्षक गणेश वंजारे यांचे मार्गदर्शन लाभले.तसेच ग्रँडमास्टर अल्ताफ खान सर, योगेश बिचीतकर सर, सचिन मरकड सर, मंगेश आहेर सर, यांचे देखील मार्गदर्शन लाभले. मणिपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धे साठी त्याची निवड झाली आहे. तायक्कांदो स्पोर्ट्स असोसिएशन अहिल्यानगर चे अध्यक्षघनश्याम सानप सर, सचिव गणेश वंजारे सर, खजिनदार धर्मनाथ घोरपडे सर यांनी सर्वांनी विराजला राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# परवानगी फाउंडेशनची, लूट पाझर तलावाची! भरदिवसा मुरुमाची चोरी; मंडल अधिकाऱ्यांचा कारवाईचा इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** चिखली येथील गट नंबर ४७० मध्ये असलेल्या शासकीय पाझर तलावातून कोणत्याही कायद्याची भीती न बाळगता तस्करांनी भरदिवसा मुरुमाचे बेकायदेशीर उत्खनन करून चोरी केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. तस्करांनी थेट मोठ्या पोकलेन मशीनचा वापर करून तलावाचे पात्र पोखरले असून, या अवैध उत्खननाचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले आहेत. यामुळे चिखली गावात एकच खळबळ उडाली असून प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप घेतला जात आहे.



सविस्तर वृत्त असे की,चिखली येथील गट नंबर ४७० मधील शासकीय पाझर तलावात गेल्या काही दिवसांपासून दिवसाढवळ्या हे अवैध काम सुरू होते. मुरुम तस्करांनी प्रशासकीय यंत्रणेला थेट आव्हान देत, मोठ्या क्षमतेचे पोकलेन मशीन लावून तलावाच्या पोटातून शेकडो ब्रास मुरूम उपसला आणि डंपरच्या साहाय्याने त्याची वाहतूक केली. स्थानिक नागरिकांनी या संपूर्ण प्रकाराचे व्हिडिओ मोबाईलमध्ये कैद केले. हे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर महसूल प्रशासनाची झोप उडाली आहे. "भरदिवसा इतक्या मोठ्या मशीनने तलाव पोखरला जात असताना अधिकारी काय करत होते?" असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

या पाझर तलावातून पोकलेनने अनिर्बंध मुरुम काढल्यामुळे तलावाच्या मूळ रचनेला मोठा धक्का पोहोचला आहे. तलावात जागोजागी मोठे खड्डे पडले असून, यामुळे येत्या पावसाळ्यात तलावाची पाणी साठवण क्षमता बाधित होण्याची भीती निर्माण झाली आहे. याचा थेट फटका परिसरातील शेतीला आणि विहिरींच्या पाणी पातळीला बसणार असल्याने शेतकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

सोशल मीडियावरील भक्कम पुराव्यांमुळे आता ही चोरी दडपण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. मंडल अधिकारी चौधरी यांनी कागदपत्रे मागवली असली, तरी भरदिवसा झालेल्या या अति-उत्खननामुळे ग्रामस्थांमध्ये अद्याप तीव्र संताप आहे. प्रशासनाने केवळ नोटिसीवर न थांबता, अवैध उत्खननात वापरलेले पोकलेन मशीन व डंपर जप्त करावेत आणि मुरुम तस्करांवर कडक गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी चिखलीतील ग्रामस्थांनी लावून धरली आहे.

# शिंगवे तुकाईच्या शेतकऱ्यांचे एमआयडीसी कार्यालयासमोर उपोषण सुरू

**वाढीव भरपाई, नोकरी आणि प्रकल्पग्रस्त हक्कांसाठी आंदोलन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नेवासा तालुक्यातील पांढरी पूल येथील औद्योगिक वसाहतीसाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींच्या मोबदल्याबाबत अन्याय झाल्याचा आरोप करत शिंगवे तुकाई येथील शेतकऱ्यांनी बुधवारी (दि. २७ मे ) अहिल्यानगर येथील एमआयडीसी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.

शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, पांढरी पूल येथील शासकीय औद्योगिक वसाहतीसाठी शिंगवे तुकाई परिसरातील सुमारे १६० शेतकऱ्यांची २५४ हेक्टर पिकाऊ जमीन संपादित करण्यात आली होती. या ठिकाणी काही उद्योग सुरू झाले असले तरी जमीन संपादनावेळी शासन आणि अधिकाऱ्यांनी दिलेली आश्वासने पूर्ण करण्यात आलेली नाहीत. तसेच भूसंपादन कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचा आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

शेतकऱ्यांनी शासनाकडे विविध मागण्या मांडल्या आहेत. इतर प्रकल्पांप्रमाणे एकरी ५० लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, प्रकल्पग्रस्तांना पांढरी पूल एमआयडीसीमध्ये व्यवसायासाठी हेक्टर २५ गुंठे मोफत जागा उपलब्ध करून द्यावी, प्रकल्पग्रस्त दाखले तातडीने द्यावेत, तसेच प्रत्येक बाधित कुटुंबातील किमान एका सदस्याला कायमस्वरूपी नोकरी द्यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.




याशिवाय थकीत नुकसानभरपाई व्याजासह मिळावी, व्यवसायासाठी जागा न दिल्यास अतिरिक्त आर्थिक भरपाई द्यावी, प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना शासकीय सेवेत आरक्षण मिळावे आणि शालेय तसेच महाविद्यालयीन शिक्षण मोफत करण्यात यावे, अशाही मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या आहेत.या उपोषणात राजेश होंडे, पांडुरंग होंडे, म्हातारदेव पुंड, किसन होंडे, सुभाष दिघे, नामदेव कुऱ्हाड, दामोदर पुंड, आशिष ठोकळ, विमल आरु, शरद धइगे, रमेश आरु आदी शेतकरी सहभागी झाले आहेत.

आंदोलन तीव्र करण्याचा इशारा

एमआयडीसी प्रशासनाने आंदोलनाची तातडीने दखल न घेतल्यास गुरुवार (दि.२८ मे )पासून अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राजेश होंडे आणि पांडुरंग होंडे यांनी दिला आहे. यासाठी प्रशासनाला कोणतीही पूर्वसूचना दिली जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### ६४ घरांवर वर्चस्वासाठी बुद्धिबळपटूंची बुद्धीची लढत



अहिल्यानगर- मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली बुद्धिबळ स्पर्धे च्या दुसऱ्या दिवशी बुद्धिबळपटूंमध्ये चुरशीचे सामने रंगले. रशियन ग्रँडमास्टर पेट्र किरियाकोव यांच्यासह भारतभरातून आलेल्या नामांकित खेळाडूंनी आपल्या बुद्धीचे कौशल्य दाखवत ६४ घरांवर वर्चस्व मिळवण्यासाठी डावपेच आखले.विशेष म्हणजे अवघ्या लहान वयातील स्पर्धकांपासून ते ९२ वर्षीय ज्येष्ठ बुद्धिबळपटूपर्यंत विविध वयोगटातील खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेत लक्षवेधी कामगिरी केली. स्पर्धास्थळी प्रत्येक पटावर खेळाडूंचे एकाग्रचित्ताने सुरू असलेले सामने आणि प्रेक्षकांचा उत्साह यामुळे बुद्धिबळप्रेमींना पर्वणी अनुभवायला मिळत आहे.

### दौंड-मनमाड रेल्वेमार्गावर शनिवारी हायस्पीड ट्रायल

अहिल्यानगर - दौंड-मनमाड रेल्वेमार्गाच्या



दुहेरीकरणाचे काम सध्या वेगाने सुरू असून, या प्रकल्पाच्या महत्त्वपूर्ण टप्प्यात शनिवार(दि. ३० मे) हायस्पीड इंजिन ट्रायल घेण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. रेल्वे प्रशासनाने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनानुसार, अहिल्यानगर जिल्ह्यातील सारोळा ते विसापूर या सेक्शनमध्ये सुमारे १६.२०किलोमीटर अंतरावर ही हायस्पीड चाचणी पार पडणार असून, या वेळी इंजिनाचा वेग ताशी १३० किलोमीटर इतका असणार आहे. हायस्पीड ट्रायलदरम्यान रेल्वे मार्गावरील तसेच लगतच्या गावांतील नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. लहान मुले, जनावरे तसेच अन्य व्यक्ती रेल्वे रुळांजवळ जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### विजय भालसिंग यांना राष्ट्रीय कार्य दर्पण सन्मान पुरस्कार जाहीर

अहिल्यानगर - येथील सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग यांना सामाजिक, धार्मिक



व पर्यावरण क्षेत्रात सुरु असलेल्या निस्वार्थ कार्याबद्दल महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्थेच्या वतीने राष्ट्रीय कार्य दर्पण सन्मान पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.शनिवार दि.१३ जून रोजी मुंबई येथे राष्ट्रीय कार्य दर्पण गौरव संमेलन होणार आहे. या संमेलनात विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते भालसिंग यांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याची माहिती संमेलनाचे आयोजक सलमा एन.खान यांनी दिली.विजय भालसिंग सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, निसर्ग व पर्यावरण क्षेत्रात गेल्या दोन दशकापासून योगदान देत आहेत. वाळकी (ता. नगर) येथील असलेले भालसिंग एसटी बॅकेची नोकरी सांभाळून निस्वार्थपणे योगदान देत असून, कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान व वर्गणी न घेता स्वखर्चातून सामाजिक कार्य करत आहे. वृक्षरोपण व संवर्धनासाठी ते सातत्याने कार्य करत आहे. उन्हाळ्यात पशु-पक्ष्यांना जगणे सुसह्य व्हावे म्हणून पाणवठे तयार करुन पाणी उपलब्ध करणे, विविध परिसरात पक्ष्यांसाठी झाडांवर धान्य व पाण्याची भांडी बसविणे, सर्वत्र वाढत चाललेल्या सिमेंटच्या जंगलामुळे पशु-पक्ष्यांचे अस्तित्व राहण्यासाठी नारळाच्या साली पासून कृत्रिमरीत्या पक्ष्यांसाठी बनवलेले घरटी बसविणे आदी निसर्ग व पर्यावरणपुरक उपक्रम ते सातत्याने राबवित आहेत.

# आनंदधाम येथे 'शिखर चातुर्मास' या धार्मिक पर्वाची जय्यत तयारी सुरू

## महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा.यांच्या सानिध्यात 'समर्पण चातुर्मास' या लोगोचे उदघाटन

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** समर्पण चातुर्मास– सर्व कल्याण, हा गुरुदेव प्रवीणऋषीजी म.सा.यांचा चातुर्मास हा शिखर चातुर्मास म्हणून चार महिन्याचा मोठा उत्सव साजरा होणार असून या निमित्त आपण राष्ट्रसंत आनंदऋषीजी म.सा.,२४ तीर्थंकर आणि स्वतःच्या आत्म्याप्रती समर्पण भाव दर्शवून चातुर्मास कार्यक्रमात प्रत्येकाने सहभागी व्हावे.शिखर चातुर्मास आनंदधाम येथे महाराष्ट्र प्रवर्तक प.पू कुंदनऋषीजी म.सा. आदी ठाना ४, यांच्या सानिध्यात होणार असून चातुर्मास निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम,व्याख्यान व धर्म प्रभावना होणार आहे.अशी माहिती बाबुशेठ बोरा व समर्पण चातुर्मास समिती च्या विश्वस्थ यांनी दिली आहे.

अर्हम विज्जा प्रणेते, उपाध्याय प.पू प्रवीणऋषीजी म.सा. एवं प.पू. तीर्थेषऋषिजी म.सा. यांचे २४ जून रोजी अहिल्यानगर शहर प्रवेश व २६ जुलै रोजी आनंदधाम येथे प्रवेश होणार आहे.शिखर चातुर्मास निमित्त ''श्री गुरु आनंद जन्मोत्सव'' हा मुख्य कार्यक्रम ६ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट या कालावधीत साजरा होणार आहे.या कालावधीत आठ दिवस उपवास व मोठ्या प्रमाणात धार्मिक कार्यक्रम होणार आहे. दि.२४ जून ते २६ जुलै, या कालावधिमध्ये महाराज साहेब हे संपूर्ण शहरामध्ये सर्व भाविक / नागरिकांची समक्ष भेट घेणार आहे. या चातुर्मास निमित्त होणाऱ्या व्याख्यान साठी दररोज चार–पाच हजार भाविक सहभागी होणार आहेत. तर गुरु आनंद जन्मोत्सव निमित्त होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमात पंधरा ते वीस हजार भाविक येतील.यासाठी शिखर चातुर्मास निमित्त मोठी जय्यत तयारी आनंदधाम येथे सुरू आहे.



श्री सौरभजी हेमराजजी बोरा यांनी समर्पण चातुर्मास मध्ये प्रमुख लाभार्थी म्हणून सन्मान स्वीकारला असून, त्यांनी संपूर्ण चातुर्मास मधील गौतम प्रसादी, मंडप व्यवस्था, एवं आनंद जन्मोत्सव या कार्यक्रमाचा लाभ घेतला आहे. यासाठी सर्व विश्वस्थांनी त्यांचे आभार मानले आहे.

शिखर चातुर्मास या धार्मिक कार्यक्रमाचे उदघाटन म्हणून ''समर्पण चातुर्मास''या लोगोचे उदघाटन महाराष्ट्र प्रवर्तक प.पू कुंदनऋषीजी म.सा.यांच्या सानिध्यात करण्यात आले. याप्रसंगी अलोकऋषीजी म.सा.,चातुर्मास कमिटीचे विश्वस्त बाबुशेठ बोरा,राजेश भंडारी,

आदेश चंगेडिया, विलास कटारिया, अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, सुरेश कांकरिया, विजय गुगळे,अभय गांधी, अभिजीत गांधी,विनोद कटारीया, संजय गुंदेचा, सचिन देसरडा, हे उपस्थित होते. तसेच या प्रसंगी चातुर्मास चे प्रमुख लाभार्थी श्री सौरभजी हेमराजजी बोरा तर्फे श्री संजय ताथेड व किरण राका, श्रावक संघ चे रतीलाल कटारिया, सावेडी स्थानक चे अनिल कटारिया, अनिल लोढा, संतोष शेटीया, पिटू गांधी आदी उपस्थीत होते. अर्हम विज्जा, व आनंदतीर्थ परिवार, तसेच अहिल्यानगर येथील सर्व जैन स्थानक जसे की केडगांव, अगरकरमळा, सारसनगर, विनायकनगर, भिंगार, सावेडी,महावीरनगर, हड्को, व बोल्हेगांव, अहिल्यानगर जिल्हय़ातील सर्व जैन स्थानक, जैन संघटना, युवा संघटना तसेच अहिल्यानगर तालुका जैन स्थानक च्या विश्वस्तांनी समर्पण चातुर्मास मध्ये सक्रिय सहभाग घेणार असल्याचे सांगितले आहे.

आदेश चंगेडिया म्हणाले, ''समर्पण चातुर्मास'' या लोगो मध्ये राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांचा फोटो दर्शविण्यात आला आहे. राष्ट्रसंत आनंदऋषीजी म.सा. यांनी दाखविलेल्या पाऊलखुणांवरच हा चातुर्मास उभा होणार आहे,असे उपाध्याय प्रवीणऋषीजी म.सा.यांनी सांगितले आहे. आनंदऋषीजी म.सा.यांच्या शिकवणीची उजळणी म्हणून हा चातुर्मास ओळखला जाणार आहे. हा चातुर्मास येणाऱ्या पिढीसाठी आदर्शवत ठरेल.

या चातुर्मास साठी भाविकांनी समर्पण व सेवाभावी वृत्तीने मोठ्या संख्येने सहभागी व समर्पित व्हावे.असे आवाहन चातुर्मास समिति या सर्व विश्वस्तांनी केले आहे.

## जयहिंद सैनिक संस्थेच्या वतीने डॉ.सुनील सकट व मच्छिंद्र गव्हाणे यांचा सत्कार



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जयहिंद माजी सैनिक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था महाराष्ट्र राज्याच्या वतीने दलित मित्र डॉ. सुनील सकट व गोपाळ समाज भूषण मच्छिंद्र गव्हाणे यांनी विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल तसेच समाजसेवा व पर्यावरण क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याबद्दल दिल्ली येथील ''मॅजीक बुक ऑफ रेकॉर्ड फाऊंडेशन'' द्वारा मानद डॉक्टरेट पदवी मिळाली. याबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मेजर निळकंठ उल्हारे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांच्या वतीने सह्याद्री चौक एमआयडीसी अहिल्यानगर येथे गोपाळ समाज भूषण मच्छिंद्र गव्हाणे या दोघांचा मानाचा फेटा बांधून शॉल व बुके देऊन भव्य सत्कार करण्यात आला.

डॉ. सुनील सकट यांनी समाजातील वंचित घटकांसाठी अहोरात्र सेवा दिली. वृक्षारोपण केले व गोरगरिबांसाठी मोलाचे सहकार्य केले. तसेच मच्छिंद्र गव्हाणे यांनी गोपाळ समाजातील सर्व महाराष्ट्रातील नवयुवकांना एकत्र करून मजबूत संघटन स्थापन करून त्यांना न्याय व हक्काचा लढा स्थापन केला. एकतेचा संदेश दिला. समाजातील दुर्लभ घटकांना जवळ करून त्यांचे पुनर्वसन केले. त्यासाठी जयहिंद संस्थेने दखल घेऊन दोन्हीही मान्यवरांचा भव्य सत्कार अहिल्यानगर एमआयडीसी मध्ये करण्यात आला. या निमित्ताने मान्यवरांच्या हस्ते जय श्रीराम गोशाळेत गौमातेसाठी चारा दान करण्यात आला.

यावेळी नवनागापूर ग्रामपंचायत सदस्य बंडूनाना सप्रे, उद्योजक बाळासाहेब मोरे, अवंती क्रेनचे मालक अनिलशेठ भिंगारे, त्रिदल सैनिक संघ निंबळकचे मारुती ताकपेरे मेजर,लहू सुलाखे मेजर, सोन्याबापु शिंदे मेजर,शानदार फेटे बांधणारे निलेश ताकपेरे,दीपक धनगर,ओंकार गंजी,शरद गव्हाणे,राजू पवार,नवनागापूर साईबाबा मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष आकाश कोल्हाळ,संकेत गुंजाळ,सागर कुर्हे,गोरख गव्हाणे,ज्ञानेश्वर कानडे,राम भारस्कर,सोमनाथ एडके आदी मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्ष मेजर उल्हारे म्हणाले की,जयहिंद सैनिक संस्था ही महाराष्ट्रामध्ये प्रत्येक क्षेत्रामध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांचे मनोभावे सत्कार करते. शेवटी जयहिंद माजी सैनिक संस्थेच्या वतीने मेजर लहू सुलाखे यांनी आभार व्यक्त केले.

## अहिल्यानगरचे सीए डॉ. प्रा. शंकर अंदानी यांचा जागतिक विक्रम; एकाच दिवशी होणार १०६ स्वलिखित पुस्तके प्रकाशित

### 'आई' विषयावर ५१२१ कवितांचा जगातील सर्वात मोठा हिंदी काव्यसंग्रह; लंडन बुक ऑफ रेकॉड्र्स व इंडिया बुक ऑफ रेकॉड्र्समध्ये होणार नोंद

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** हिंदी आणि मराठी साहित्य क्षेत्रात अभूतपूर्व कार्य करत अहिल्यानगरचे सुपुत्र सीए (डॉ.) प्रा. शंकर घनशामदास अंदानी यांनी जागतिक स्तरावर नवा इतिहास घडविला आहे. एकाच दिवशी तब्बल १०६ स्वलिखित पुस्तके प्रकाशित करण्याचा विक्रम त्यांनी आपल्या नावावर नोंदविला असून, 'आई' या विषयावर ५१२१ कवितांचा जगातील सर्वात मोठा हिंदी काव्यसंग्रह प्रकाशित करण्याची ऐतिहासिक कामगिरीही त्यांनी केली आहे.

साहित्य, समाजकार्य आणि विक्रमांच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सीए शंकर अंदानी यांच्या या कार्याची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावरील लंडन बुक ऑफ रेकॉड्र्स तसेच भारतातील प्रसिद्ध इंडिया बुक ऑफ रेकॉड्र्स या संस्थांनी घेतली असून त्यांच्या कार्याची अधिकृत नोंद होणार आहे.

'मा की ममता मा अनेकता की शक्ति' या नावाने प्रकाशित होत असलेल्या भव्य हिंदी काव्यसंग्रहात संपूर्ण भारतातील १४० कवींनी लिहिलेल्या कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. तब्बल ५१२१ कवितांचा हा संग्रह जगातील सर्वात मोठा मातृत्वविषयक हिंदी काव्यसंग्रह मानला जात आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात साहित्य संकलन आणि संपादनाचे कार्य आजवर जगात कुणीही केले नसल्याचा दावा करण्यात येत आहे.

याचबरोबर सीए शंकर अंदानी यांनी स्वतः लिहिलेल्या एकूण १२१०० कवितांचे विविध पुस्तकांमध्ये प्रकाशन होत असून, हा देखील एक जागतिक विक्रम ठरत आहे.






साहित्यविश्वात सर्वाधिक कविता प्रकाशित करण्याचा मान देखील त्यांच्या नावावर नोंदविला जात आहे. मराठी साहित्य क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. 'वडील बाबा अबोल जीवनाचे कोडे' या नावाने महाराष्ट्रातील ८० कवींच्या ११६१ कवितांचे संकलन असलेला मराठी कवितासंग्रह प्रकाशित होत आहे. तसेच 'बहिण माझी प्रिय ताई' या नावाने बहिणीवरील ११६१ कवितांचा स्वतंत्र संग्रह प्रकाशित केला जात आहे.

या सर्व उपक्रमांमुळे एकाच दिवशी तब्बल पाच जागतिक विक्रम सीए शंकर अंदानी यांच्या नावावर नोंदविले जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. सदर भव्य प्रकाशन सोहळा ३० मे २०२६ रोजी पुणे येथे होणार असून, विविध क्षेत्रातील नामवंत राजकीय नेते, साहित्यिक, लेखक, कवी आणि मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे.

सीए शंकर अंदानी हे केवळ साहित्यिक नसून समाजसेवक म्हणूनही त्यांनी मोठे कार्य केले आहे. अनेक मंदिरे, धर्मशाळा, सामाजिक संस्था, चर्च, मस्जिद तसेच विविध सामाजिक संघटनांचे आर्थिक व करसल्लागार कामकाज त्यांनी अत्यंत अल्प दरात किंवा विनामूल्य केले आहे. २०२२ मध्ये त्यांनी ३६४ मंदिरे, मस्जिद, चर्च आणि सामाजिक संस्थांचे कामकाज केल्याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉड्र्सने घेतली होती. याबाबतची माहिती संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

इंडिया बुक ऑफ रेकॉड्र्स ही संस्था देशभरातील उल्लेखनीय कार्य आणि विक्रमांची काटेकोर तपासणी करूनच नोंद करते. अत्यंत मर्यादित व्यक्तींना या संस्थेकडून अधिकृत मान्यता दिली जाते. त्यामुळे सीए शंकर अंदानी यांच्या कार्याला मिळालेली ही दखल विशेष महत्त्वाची मानली जात आहे.

सीए शंकर अंदानी यांना यापूर्वीही अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सन्मान प्राप्त झाले आहेत. युनायटेड नेशन अमेरिका तसेच अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष कार्यालयाकडून त्यांना ''मेडल ऑफ एक्सलन्स'' हा प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. त्यांच्या नावावर आतापर्यंत तब्बल ३१८० राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांची नोंद असून, ११५ जागतिक विक्रम आणि १५० मानद डॉक्टरेट मिळाल्या आहेत. व्यवसायाने सनदी लेखापाल असलेले सीए शंकर अंदानी हे श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी येथे मागील १८ वर्षांपासून करसल्लागार म्हणून कार्यरत होते. तसेच अहिल्यानगर महानगरपालिकेचे मागील २० वर्षांपासून करसल्लागार म्हणून ते कार्य करत आहेत. अनेक शासकीय संस्था, बँका आणि पतसंस्थांचे ते लेखापरीक्षक व करसल्लागार म्हणूनही कार्यरत आहेत.

## स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्त भिंगारमध्ये वृक्षारोपण व स्वच्छता अभियान



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भिंगार मध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. गौतम बुद्ध जॉगिंग पार्क परिसरात पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि सामाजिक जागृतीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात वृक्षारोपण, स्वच्छता अभियान तसेच सेवापूर्ती सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा आणि सीए रवींद्र कटारिया यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी सावरकर यांच्या राष्ट्रभक्ती, त्याग आणि क्रांतिकारक कार्याला अभिवादन केले. यानंतर पार्क परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. उद्यानातील कचरा हटविणे, परिसर स्वच्छ करणे तसेच वाढलेली काटेरी झाडे आणि झुडपे हटवून परिसर स्वच्छ व सुशोभित करण्यात आला. या उपक्रमातून ''स्वच्छ परिसर, सुंदर परिसर'' हा संदेश देण्यात आला.

पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने ॲड. सुरेंद्र कटारिया आणि शामराव पांढरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याच कार्यक्रमात एसटी महामंडळातून सेवानिवृत्त झालेले शामराव माधवराव पांढरे यांच्या सेवापूर्तीनिमित्त त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, अशोक पराते, दिलीपराव ठोकळ मेजर, राजू जंगम, जहीर सय्यद, संजय ढोणे, सर्वेश सपकाळ, जालिंदर अळकुटे, दिलीपशेठ गुगळे, नवनाथ वेताळ, अभिजीत सपकाळ, सखाराम अळकुटे, भाऊसाहेब सावळे, कुमार धतुरे, योगेश चौधरी, उमाशंकर सिंह, दीपक अमृत, ताराचंद ठोकळ आदी उपस्थित होते.

संजय सपकाळ म्हणाले की, ''स्वातंत्र्यवीर सावरकर हे केवळ क्रांतिकारक नव्हते, तर ते समाजप्रबोधन करणारे विचारवंत होते. त्यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण आणि स्वच्छता अभियान राबवून आम्ही समाजाला सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न करत आहोत. पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून प्रत्येक नागरिकाने वृक्ष लागवड आणि स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. हरदिन मॉर्निंग ग्रुप सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम सातत्याने राबवत राहणार असल्याचे स्पष्ट केले.

ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे म्हणाले की, ''समाजात स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक एकोपा वाढविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. वृक्ष हेच भविष्यातील जीवनाचे आधार आहेत. प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे.''

सचिन चोपडा म्हणाले की, ''स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन या केवळ सरकारी जबाबदाऱ्या नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

## शहरात तिसरी धम्म परिषद उत्साहात

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** तथागत बुद्धिस्ट सोसायटी (भारत) यांच्या वतीने शहरात आयोजित करण्यात आलेली तिसरी धम्म परिषद उत्साहात पार पडली. त्याग, समर्पण आणि संघर्षाचे प्रतीक असलेल्या त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळ्याला बौद्ध अनुयायांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

न्यू टिळक रोड, सक्कर चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात दिवसभर विविध कार्यक्रमांनी हा सोहळा रंगला. धम्म परिषदेची सुरुवात पंचशील ध्वजारोहण आणि सुत्तपठणाने करण्यात आली. त्यानंतर माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी सुनिल साळवे, विजय भांबळ, एन.एम. पवळे, विलास साठे, एल.बी. जाधव, सुशांत म्हस्के, अमित काळे, प्रतिक बारसे, प्रविण चाबुकस्वार, संध्याताई मेढे, आनिता आंग्रे, आरती बडेकर, अविनाश कांबळे, अविनाश भोसले, अक्षय भिंगारदिवे, विवेक भिंगारदिवे, शेखर पंचमुख, हर्षल कांबळे, संदिप वाघमारे, शांताराम बनसोडे, जयराम आंग्रे, संतोष गायकवाड, रमेश वाघमारे, रमेश पगारे, संजय शिंदे, विजय गायकवाड, हिरा पाडळे, शाम वाघचौरे, रोहित (बंडु) आव्हाड, रविंद्र घोसाळे, विश्वास गायकवाड, श्रीकांत देठे, विजयकुमार ठोंबे, सिंध्दात कांबळे, प्रमोद शिंदे, सिध्दार्थ भिंगारदिवे, दिपक गायकवाड आदींसह पूज्य भन्ते भिक्खू, समाजबांधव, माता-भगिनी आणि बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात तथागत बुद्धिस्ट सोसायटीचे अध्यक्ष संजय कांबळे यांनी माता रमाई आंबेडकर यांच्या त्यागमय जीवनकार्याचा उल्लेख करताना सांगितले की, ''माता रमाई यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खंबीर साथ दिली. त्याग, समर्पण आणि प्रेरणेचे



प्रतीक असलेल्या माता रमाई यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित धम्म परिषद आणि धम्मदीक्षा सोहळ्याच्या माध्यमातून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या माध्यमातून बुद्ध धम्माची शिकवण समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे कार्य सुरू आहे.''

संध्याकाळी ४ वाजता अविनाश कांबळे प्रस्तुत बुद्ध-भीम गीतांचा ''कादंबरी आर्केस्ट्रा'' हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमातून बौद्ध आणि आंबेडकरी विचारांचा जागर करण्यात आला. विविध गीतांमधून समता, बंधुता, सामाजिक परिवर्तन आणि मानवतेचा संदेश देण्यात आला.

विशेष धम्म मार्गदर्शन सत्रात विविध भागांतून आलेल्या भन्ते यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यामध्ये पुज्य भन्ते सचित्तबोधी (पुणे), भारतीय बौद्ध महासभा राष्ट्रीय महासचिव पूज्य भिक्खु डॉ. सुमेधबोधी (मुंबई), परमानंद विपश्यनाचार्य (बुद्ध गया), भारद्वाज (येवला मुक्ती भूमी), आनंद मित्त (पुणे), धम्मपाल (अहिल्यानगर), शासन मैत्रीय (सुरत), चंद्रबोधी (हरियाणा), सागरबोधी (जालना), महानंदा (परभणी), सुमेधबोधी (नांदेड), संघरक्षित (आंबळनेर), भिक्खुनी शासन उपचला (हिंगोली) यांचा समावेश होता. या मार्गदर्शन सत्रात बुद्ध धम्म, मानवता, समता, करुणा आणि सामाजिक परिवर्तन या विषयांवर सखोल विचार मांडण्यात आले.

# कथा, कविता सादरीकरण, चर्चा सत्र, पुस्तके प्रकाशन : दुसरे राष्ट्रीय हिंदी लघुकथा संमेलन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कथा, कविता, चर्चा सत्रे, पुस्तके प्रकाशन, परिसंवाद, पुरस्कार वितरण, गौरव सन्मान इत्यादी भरगच्च कार्यक्रमातून दुसरे राष्ट्रीय हिंदी लघुकथा संमेलन उत्साहात संपन्न झाले. स्नेहालय, डॉ. शंकर केशव आडकर चॅरिटेबल ट्रस्ट, आचार्य जगदीश चंद्र मिश्र लघुकथा संशोधन केंद्र, हिंदी सुरजन सभा यांच्या संयुक्त विद्यमाने एमआयडीसीमधील स्नेहालय पुनर्वसन प्रकल्पात संपन्न झालेल्या या नावीन्यपूर्ण संमेलनात देशभरातील हिंदी लघुकथाकार, संशोधक, कवी, पत्रकार, साहित्यिक, विचारवंत, समीक्षक, भाषा प्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

२१ व्या शतकातील पहिले शतकोत्तर रौप्य महोत्सवातील हिंदी लघुकथांचे चैतन्याचे नवीन स्वर या महत्त्वपूर्ण विषयावरील परिसंवाद चर्चासत्राचे उद्घाटन नवी दिल्लीतील हिंदीचे वरिष्ठ साहित्यकार डॉ. बलराम अग्रवाल यांनी केले. डॉ ऋचा शर्मा यांचे 'एक दिन हर दिन' हा लघुकथा संग्रह, जयपूरच्या अनिता सैनी यांच्या 'मुक्त फिर भी', ठाण्याच्या निर्मो ही फडके यांचा अनुदित कहानी संग्रह, अनुवादक डॉ. वसुधा सहस्रबुद्धे यांच्या पुस्तकाचे यावेळी प्रकाशन झाले. त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

हिंदी ही कोट्यवधींची मातृभाषा, संपर्क व संवादाची भाषा असून भारतीय संस्कृती, मूल्ये, परंपरा, संतकाव्य, भक्तीपर साहित्य, लोककथा, म्हणी यांमधून सांस्कृतिक वैभव फुलविण्याबरोबर विविध प्रांत, जाती, समाजांना जोडण्याचे कार्य हिंदी भाषेने केले. त्यामुळे या भाषेचा सन्मान, संवर्धन व प्रचार करण्याची जबाबदारी प्रत्येक भारतीयाची आहे, असे विविध वक्त्यांनी प्रतिपादन केले.

इंडिया नेट बुक्स पब्लिकेशन, नोएडा येथील संचालक डॉ. संजीव कुमार, वरिष्ठ कथाकार डॉ. प्रमिला वर्मा, सुनीता शेवगावकर, मुंबईच्या अलका पांडे, भोपाळच्या श्रीमती कांता रॉय, डॉ. रमेश यादव, डॉ. अलका अग्रवाल, ममता माली प्रिया बादल श्रुती बेडेकर मृदुल भटनागर सतीश श्रीवास्तव नरेंद्र छाबडा डॉ. मियिलेश अवस्थी, डॉ. राजकुमार घोटड, राजस्थानच्या पुष्प कुमारी आदी प्रभृतींनी लघुकथेद्वारे होणाऱ्या प्रभावाविषयी विचार मांडले. स्नेहालय इंग्लिश मीडियमच्या विद्यार्थ्यांनी लघुकथेद्वारे बालमनावर होणाऱ्या संस्कारांचे महत्त्व पटवून देणारी सादरीकरणे केली. विविध मान्यवरांनी लघुकथांचे सादरीकरण केले. आचार्य जगदीश चंद्र मिश्र सन्मान समितीचे विविध पुरस्कार, लघुकथा स्पर्धेचे पारितोषिक वितरण संपन्न झाले. संयोजक डॉ. गिरीश कुलकर्णी, ऋचा शर्मा, अशोक कुरापाटी यांनी स्वागत केले. डॉ. पौर्णिमा बेहरे, डॉ. वृषाली मांडे, आनंद त्रिपाठी, वनिता मोकाटे, वीणा दिघे, डॉ दीपा कुचेकर, मनवीर कौर, आस्था शर्मा यांनी विविध सभांचे सूत्रसंचालन केले.

सर्वश्री राजीव शर्मा, डॉ. संजय राठोड, सुनील कात्रे संगीता सानप, माऊली अशोक अकोलकर, कृतुजा काळे ॲडव्होकेट उमेश नगरकर यांनी संमेलन यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# एक स्त्री निरोगी राहिली तर परिवारासोबत समाज निरोगी बनवते – डॉ.सुधाताई कांकरिया

## आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये स्त्रीरोग तपासणी शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आमच्या मातोश्री स्वातंत्र्य सैनिका स्व. मानकुवरबाई कांकरिया यांनी स्वातंत्र्यसंग्रामात महात्मा गांधी व विनोबा भावे यांच्यासोबत काम केले आहे.तसेच स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी नऊ महिन्यांचा तुरुंगवास भोगला आहे. स्वातंत्र्य सैनिका म्हणून त्यांचा भारत सरकारने गौरव केला आहे.त्यांची सून असल्याचे भाग्य मला लाभले आहे.स्त्री ही सृष्टीचा आधार आहे. कुटुंबाचा आधारस्तंभ आहे.आई ही पाठशाळा व पहिली गुरु असते.वास्तल्य नावाच्या जागतिक विद्यापीठाचे कुलगुरू आई हीच असते.एक स्त्री शिकली तर कुटुंब साक्षर होते. त्याचप्रमाणे एक स्त्री निरोगी राहिली तर परिवारा सोबतच समाज निरोगी बनवते.निरोगी आरोग्य संपन्न समाजाची गुरुकिल्ली एक स्त्रीच असते. घराला घरपण देणारी ही देखील एक स्त्रीच असते.या शिबिराच्या माध्यमातून महिलांच्या विविध आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे.तसेच गर्भवती मातांची देखील तपासणी होणार आहे.आईचा गर्भ हे तीर्थक्षेत्र आहे.आईच्या गर्भात मुलगा किंवा मुलगी असो त्यांचे मनापासून स्वागत झालेच पाहिजे.जन्माला येण्यापूर्वीच मुलगी आहे म्हणून ती ची हत्या केली.तर यासारखे महापाप कोणतेच नाही.गर्भात असलेल्या बाळाचे रक्षण करणे.हे ध्येय बाळगून स्त्री जन्माचे स्वागत करावे.असे प्रतिपादन समाजसेविका डॉ. सुधाताई कांकरिया यांनी केले आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये स्त्रीरोग,गर्भवती महिला तपासणी व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन स्वातंत्र्य सैनिका स्व.मानकुवरबाई कन्हैयालालजी कांकरिया यांच्या स्मरणार्थ कांकरिया परीवाराच्यावतीने करण्यात आले होते.या शिबिराचे उद्घाटन प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ.प्रकाश कांकरिया व डॉ.सुधाताई कांकरिया यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.याप्रसंगी जैन सोशल फेडरेशनचे डॉ.वसंत कटारिया, माणकचंद कटारिया,अभय गुगळे,सुभाष मुनोत,वसंत चोपडा,प्रकाश छल्लाणी,डॉ. आशिष भंडारी तसेच शिबिराचे तज्ञ डॉ.रवींद्र मुथा,डॉ.कृतिका पाटील आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ.वसंत कटारिया म्हणाले,डॉ.प्रकाश कांकरिया हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे नेत्रतज्ञ आहेत.या शिबिराचे त्यांनी प्रायोजकत्व स्वीकारले आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या उभारणीपासूनच डॉ.कांकरिया यांचे मोलाचे योगदान लाभत आहे.डॉ. कांकरिया यांच्या मातोश्री स्व.मानकुवरबाई कांकरिया या थोर स्वातंत्र्य सैनिका होत्या.देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात ते अग्रणी होत्या.तसेच डॉ.सुधाताई कांकरिया यांनी ''बेटी बचाव बेटी पढाओ'' व ''स्त्री जन्माचे स्वागत करा'' हा नारा देऊन गेली ४० वर्ष समाजसेवेच्या कार्यात अग्रेसर आहेत.तसेच ब्रह्मकुमारी ईश्वरीय विद्यालयाच्या माध्यमातून योग शिबिरात योगदान देत आहेत.योगाची आवड निर्माण करीत आहेत.जैन सोशल फेडरेशनच्या कार्यात डॉ.प्रकाश कांकरिया यांच्यासारखे निस्वार्थ सेवेचे कार्य करणारे विश्वस्त लाभले आहे.याचा आम्हा सर्वांना अभिमान वाटत आहे.

डॉ.कृतिका पाटील म्हणाले, गर्भवती महिलांनी बाळंतपणाच्या काळात पालेभाज्या,ड्रायफूट्स,फलाहार व सकस आहार घेणे महत्त्वाचे आहे.तसेच गर्भवती महिलांनी तीस ते पस्तीस मिनिटे चालणे, फिरणे आवश्यक आहे. प्रोटीन युक्त व सकस आहार घेतल्यामुळे गर्भातील बाळाच्या वजनामध्ये व्यवस्थित वाढ होईल.गर्भवती महिलांना रक्तलघवी,सोनोग्राफी,एक्स-रे विविध तपासण्यांसाठी ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे.तसेच अठरा वयाच्या पुढील महिलांनी वेळेवर तपासणी करण्यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे संपर्क साधावा.तसेच स्त्री रोग तपासणी शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा.असे आवाहन केले. या शिबिरात ६० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

# आरोग्या संदर्भात महिलांनी सोशल मीडियावरील माहिती ऐवजी तज्ज्ञ डॉक्टरांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन घ्यावे – डॉ. अमोल जाधव

## प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व योजनेअंतर्गत नागरदेवळे येथे गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व योजनेअंतर्गत प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला गर्भवती महिलांची विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येते. या उपक्रमाअंतर्गत सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल तर्फे स्त्डॉरी रोग तज्ज्ञ डॉ. अमोल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांची सखोल तपासणी करण्यात येत आहे. नगर तालुक्यातील नागरदेवळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात ही तपासणी झाली.

या तपासणीमध्ये डॉ. जाधव यांनी गर्भवती महिलांमधील हाय रिस्क प्रेग्नन्सी ओळखणे, रक्तदाब कमी किंवा जास्त असणे, रक्तातील हिमोग्लोबिन कमी असणे, शुगर, सूज, तसेच आईच्या पोटातील बाळाची वाढ कमी असणे किंवा पाणी कमी असणे अशा विविध समस्यांचे निदान करून योग्य उपचार मार्गदर्शन केले. तसेच सुरक्षित व नॉर्मल डिलिव्हरीसाठी आवश्यक असणारे आहार, व्यायाम, जीवनशैली आणि काळजी याबाबत महिलांचे समुपदेशन करण्यात येते. गर्भधारणेपासून ते प्रसूतीपर्यंतचा नऊ महिन्यांचा प्रवास सुरक्षित, निरोगी आणि आनंददायी व्हावा यासाठी सरस्वती हॉस्पिटल सातत्याने कार्यरत आहे. महिलांनी



नियमित तपासणी करून आई व बाळाच्या आरोग्याची योग्य काळजी घ्यावी.सध्या सोशल मीडियावर विविध प्रकारचे रिल्स आणि माहिती मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळते. मात्र प्रत्येक माहिती सर्वांसाठी योग्य असेलच असे नाही. अनावश्यक किंवा चुकीच्या माहितीकडे पाहून मनात भीती निर्माण करून घेऊ नये तसेच प्रत्येक गोष्ट स्वतःशी जोडून कॉम्प्लिकेशनची चिंता करू नये. कोणतीही शंका असल्यास तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा ९ वर्षांच्या वाटचालीत डॉ. अमोल जाधव यांनी सामाजिक बांधिलकी जपत शासनाच्या विविध आरोग्य योजनांतर्गत महिला आरोग्याचा जागर केला आहे. शहरी तसेच ग्रामीण भागात शिबिरे घेऊन महिलांना आरोग्य विषयक बहुमूल्य मार्गदर्शन केले आहे.

गर्भधारणेपासून प्रसूतीपर्यंतचा नऊ महिन्यांचा प्रवास सुरक्षित, निरोगी आणि आनंददायी व्हावा यासाठी सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सातत्याने कार्यरत आहे.बाळंतपणात आईच्या गर्भात असलेल्या बाळाची वाढ, त्याचे आरोग्य तपासणीसाठी सोनोग्राफी महत्त्वाची असते. सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे आता सध्याच्या काळातील सर्वात आधुनिक ॲडव्हान्स ५ डी सोनोग्राफी मशीन (ॲनोमली स्कॅन) कार्यान्वित झाले आहे. यामुळे गर्भातील बाळाच्या आरोग्याचे अत्यंत सखोल व अचूक परीक्षण शक्य झाले आहे. हॉस्पिटलमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे मॉड्युलर ऑपरेशन थिएटर उभारण्यात आले असून अधिक सुरक्षित, इन्फेक्शन कंट्रोल आणि उच्च दर्जाची शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध झाली आहे. आई व बाळाला सुरक्षित संसर्ग विरहित वातावरण मिळण्यासाठी खास डिझाईन केलेले सुसज्ज डिलिव्हरी रूम साकारण्यात आले आहे. याशिवाय प्रसूती अधिक सुलभ, सुरक्षित आणि कम्फर्टेबल करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाची आधुनिक उपकरणे उपलब्ध आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सर्व रिपोर्ट ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येतात. सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये फक्त नवा जीव जन्माला येत

### संस्थापक अध्यक्ष मा. एकनाथराव ढाकणे यांच्या

# वाढदिवसानिमित्त 'मेगा ओपन कॅम्पस ड्राइव्ह २०२६' चे आयोजन सर्वांसाठी खुला रोजगार मेळावा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** केदारेश्वर ग्रामीण विकास प्रतिष्ठान, संगमनेर संचलित ढाकणे शैक्षणिक संकुल, राक्षी (शेवगाव) यांच्या वतीने संस्थापक अध्यक्ष मा. एकनाथराव ढाकणे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त ''मेगा ओपन कॅम्पस ड्राइव्ह २०२६'' चे आयोजन करण्यात आले आहे. हा रोजगार मेळावा सर्व पात्र उमेदवारांसाठी खुला ( ) असून कोणत्याही महाविद्यालयातील विद्यार्थी व माजी विद्यार्थी सहभागी होऊ शकतात,हा मेगा रोजगार मेळावा सोमवार, दि. ०१ जून २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता समाजभूषण एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, राक्षी येथे आयोजित करण्यात आला आहे,



या कॅम्पस ड्राइव्हमध्ये अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, आयटीआय, एमबीए, एमसीए तसेच इतर पदवी व पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेले किंवा अंतिम वर्षात शिकणारे विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. विविध नामांकित उद्योग, उत्पादन, सेवा व तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांच्या प्रतिनिधींकडून थेट मुलाखती घेण्यात येणार असून पात्र उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत,

या रोजगार मेळाव्याची वैशिष्ट्ये सर्व महाविद्यालये व संस्थांतील विद्यार्थ्यांसाठी खुला फ्रेशर्स व अनुभवी उमेदवारांना संधी, नामांकित कंपन्यांचा सहभाग थेट मुलाखती व ऑन-द-स्पॉट निवड प्रक्रिया , रोजगार व करिअर मार्गदर्शन, इच्छुक उमेदवारांनी अद्ययावत बायोडाटा, शैक्षणिक कागदपत्रांच्या प्रती, आधार कार्ड व पासपोर्ट आकाराचे फोटो सोबत आणावेत,युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या भव्य उपक्रमाचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी व नोकरी इच्छुकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ढाकणे शैक्षणिक संकुलाच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिक्षकाची सभापतींच्या स्वीय सहाय्यकपदी नियुक्ती; चौकशीची मागणी




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पंचायत समिती पैठण येथे कार्यरत असलेल्या एका शिक्षकाची सभापतींच्या स्वीय सहाय्यकपदी नियुक्ती करण्यात आल्याचा प्रकार समोर आला असून, याबाबत छावा क्रांतिवीर सेनेच्या वतीने चौकशीची मागणी करण्यात आली आहे. माहिती अधिकारातून प्राप्त झालेल्या कागदपत्रांनुसार जि.प. प्रशाला लोहगाव येथील पदवीधर प्राथमिक शिक्षक जनार्दन बाजीराव दराडे हे प्रत्यक्ष अध्यापनाऐवजी पंचायत समिती सभापती कार्यालयात स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत असल्याचे समोर आले आहे. शिक्षकांची नियुक्ती विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी करण्यात आलेली असताना त्यांच्याकडून राजकीय पदाधिकाऱ्यांच्या कार्यालयीन कामकाजासाठी सेवा घेतली जात असल्याने शिक्षण व्यवस्थेवर परिणाम होत असल्याचा आरोप छावा क्रांतिवीर सेनेने केला आहे. सदर नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी, प्रतिनियुक्ती आदेश अथवा शिक्षण विभागाची पूर्वपरवानगी घेण्यात आली आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. तसेच शिक्षण विभागातून वेतन घेत असताना प्रत्यक्ष काम अन्यत्र होत असल्यास सार्वजनिक निधीचा गैरवापर झाल्याची शक्यता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून भारतीय संविधानाने दिलेल्या शिक्षणाच्या अधिकारावरही त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो, असे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे लेखी तक्रार देण्यात आली असून संपूर्ण विभागीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच संबंधित शिक्षकाची उपस्थिती, वेतन व प्रत्यक्ष कार्यस्थळाची तपासणी करून नियमबाह्य प्रकार आढळल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी प्रदेश सरचिटणीस अनिल राऊत, रामेश्वर बावणे, भगवान सोरमारे, कृष्णा काळे आदी उपस्थित होते.

# भाविकांच्या प्रतिसादामुळेच भगवानगडाची महती जगभर पसरली – महंत नामदेव शास्त्री

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार –** पाथर्डी तालुक्यातील अकोले येथे ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबांनी आधिकमास (पुरुषोत्तम मास) निमित्त आरंभीत केलेल्या भव्य अखंड हरिनाम सप्ताहाची शुक्रवारी सांगता झाली. काल्याच्या किर्तन प्रसंगी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांनी श्री संत भगवानबाबांच्या अनेक सामाजिक कार्यावर प्रकाश टाकला. शास्त्रीजी म्हणाले की, ६६ वर्षांपूर्वी ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबांनी अकोले गावामध्ये सप्ताहाचा प्रारंभ करून याच गावामध्ये बाबांनी स्वतः काला केला. त्यामुळे अकोले हे गाव खरोखर भाग्यवान आहे. भगवानगडाची महती आणि व्यापकता सर्वदूर पसरल्यामुळे देशभरातून लोक आपल्या गडावर येतात. भगवानगडाच्या परिसरामध्ये एखाद्या गावामध्ये जर कोणी नवीन पाहुणा आला तर परिसरातील लोक भगवानगडावर चला म्हणण्याऐवजी स्वाभिमानाने आमच्या गडावर झाला असे म्हणतात. अर्थात भगवानगडाच्या भक्तांचा हा स्वाभिमान आहे. भगवानगड हीच आपली ओळख आहे. भाविकांच्या प्रतिसादामुळेच आज आपल्या गडाची महती जगभर पसरलेली आहे. भगवानगडावरील विद्यार्थ्यांना स्वतः श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्रीजी बाबा शिकवत असल्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली गडाचा विद्यार्थी म्हणजे जणू एक हिरा चमकत आहे असे वाटते. वीस वर्षांपूर्वीचा भगवानगड आणि आजचा भगवानगड यामध्ये खूप सुधारणा झालेली भक्तांना पहावयास मिळत आहे. याचे सर्व श्रेय शास्त्रीजी गडाच्या भक्तांना देतात.



(छाया– सतिष जगताप )

या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये सात दिवस ह.भ.प.भागवताचार्य श्री.प्रकाश महाराज साठे यांची श्रीमद भागवत कथा संपन्न झाली. सप्ताहामध्ये व्यासपीठ चालक म्हणून आचार्य शिवाजी महाराज रायपुरे (बुलढाणा) यांनी सेवा दिली. तसेच सप्ताहामध्ये पुढीलप्रमाणे कीर्तनकारांची कीर्तनसेवा संपन्न झाल्या : शुक्रवार दि.२२/०५/२०२६ रोजी ह.भ.प.महत कृष्णा महाराज शास्त्री (उत्तराधिकारी श्रीक्षेत्र भगवानगड), शनिवार दि.२३/०५/२०२६ रोजी ह.भ.प. विनोदाचार्य विलास महाराज गेजगे (परभणी), रविवार दि.२४/०५/२०२६ रोजी ह.भ.प.सोपान महाराज शास्त्री (हिंगोली), सोमवार दि.२५/०५/२०२६ रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळकीकर (आळंदी), मंगळवार दि.२६/०५/२०२६ रोजी ह.भ.प. विनोदाचार्य निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर), बुधवार दि.२७/०५/२०२६ रोजी ह.भ.प. तुकाराम महाराज मुंढे (परळी), गुरुवार दि.२८/०५/२०२६ रोजी ह.भ.प. जगन्नाथ महाराज शास्त्री (जगदंबा गड, कारेगाव), शुक्रवार दि.२९/०५/२०२६ रोजी सकाळी ९ ते ११ वा. ह.भ.प.डॉ. न्यायाचार्य गुरुवर्य महंत नामदेव महाराज शास्त्री (श्रीक्षेत्र भगवानगड) यांचे अमृततुल्य काल्याचे किर्तन व त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता झाली.

(पान १ वरून)

## निविदेशिवाय नाली काम सुरू असल्याचा आरोप; नागरिकांमध्ये संताप

विशेष म्हणजे हा परिसर नगरपालिकेच्या हद्दीत येत नसतानाही नागरिकांना त्रास दिला जात असल्याची तक्रार स्थानिकांनी व्यक्त केली आहे. अद्याप कोणत्याही दुकानदाराला किंवा घरमालकाला लेखी नोटीस देण्यात आलेली नसून केवळ भोंग्याद्वारे सूचना देण्यात येत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

''नियमबाह्य पद्धतीने कारवाई करून गरीब दुकानदारांचे संसार उद्ध्वस्त केले जात आहेत. संबंधित नाली कामाची मंजुरी, निविदा प्रक्रिया आणि ठेकेदाराची माहिती प्रशासनाने तात्काळ जाहीर करावी,'' अशी मागणी स्थानिक नागरिक व व्यापाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## महामार्गावरील दिशादर्शक फलकांवरील जुनी नावे तात्काळ बदलण्याची मागणी; अन्यथा आंदोलनाचा इशारा

असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला असून नागरिकांच्या भावना दुखावल्या जात असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, शासन निर्णयानुसार सर्व शासकीय फलक, दिशादर्शक बोर्ड व सार्वजनिक ठिकाणांवर अधिकृत नवीन नावे वापरणे बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी अद्याप ''औरंगाबाद'' व ''अहमदनगर'' ही जुनी नावे कायम दिसून येत आहेत, ही गंभीर बाब आहे.

यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष सूरज कोतकर, ओबीसी सेलचे अध्यक्ष दीपक खेडकर, कार्याध्यक्ष नितीन घोडके, शहर संघटक राजेश भालेराव, सूरज शिंदे, ऋषिकेश रासकर, संकेत कराड, गणेश भालसिंग, सक्षम जाधव, अभिजीत खरात, कृष्णा शेळके, ओंकार जाधव, सार्थक लोहार, शिवाजी शिंदे, निलेश रासकर, सनी टेकाडे, सार्थक तागड, आशिष भगत आदी पदाधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रवादी युवक काँग्रेसने स्पष्ट केले आहे की, जर आठ दिवसांच्या आत सर्व फलकांवरील नावे बदलण्यात आली नाहीत, तर तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडले जाईल. तसेच लोकशाही मार्गाने निषेध नोंदविण्यात येईल आणि संभाव्य परिस्थितीतील जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

## गावठी हातभट्टीवर तीन ठिकाणी कारवाई

मिळालेल्या माहितीवरून एमआयडीसी पोलिसांनी दिनांक २८ रोजी कोल्हेटेक निमगाव घाणा येथे आरोपी राजू सखाराम गव्हाणे (वय ४५ वर्षे रा. कोल्हेटेक निमगाव घाणा) त्याच्या घराच्या आडोशाला ठेवलेले ५० हजार रुपये किमतीचे १००० लिटर कच्चे रसायन, वीस हजार रुपये किमतीची तयार गावठी हातभट्टी दारू व दारू तयार करण्याचे साहित्य छापा टाकून नष्ट केले.

खातगाव टाकळी येथे राजेंद्र विलास पवार (वय २२ वर्षे रा. खातगाव टाकळी) याच्या घराच्या पाठीमागील ओढ्यात लपवून ठेवलेले पाच हजार रुपये किमतीचे १०० लिटर कच्चे रसायन, चार हजार रुपये किमतीची ४० लिटर तयार गावठी हातभट्टी दारू व दारू तयार करायचे साहित्य असा मुद्देमाल नष्ट करण्यात आला. तसेच टाकळी खातगाव येथे विनोद दिलीप पवार (वय २२ वर्षे रा. खातगाव टाकळी) याच्या घराच्या पाठीमागे लपवून ठेवलेले चार हजार रुपये किमतीचे ८० लिटर कच्चे रसायन, तीन हजार रुपये किमतीची ३० लिटर गावठी हातभट्टी दारू व दारू तयार करण्याचे साहित्य छापा टाकून नष्ट करण्यात आले. याप्रकरणी तीन आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ ई प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.